# देव वरील विश्वास नोहाची शिक्षेपासून सुटका करतो

## बाप्तिस्म्या विषयी शिक्षण देण्यासाठी

मुलांचा वयोगट आणि गरजा ह्यांना अनुरूप असे शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

शिक्षक, प्रार्थना व पवित्र शास्त्राचे वाचन याद्वारे स्वत:ची तयारी करा.

**उत्पति अध्याय 6,7 व 8** वाचून जलप्रलया विषयी तुम्हांला महत्वाच्या वाटणाया गोष्टी लिहून काढा.



**पाहा**

- 6:5-9 मध्ये, नोहाचा स्वभाव कसा होता.
- 6:5-7 मध्ये, देवाने त्यानेच निर्माण केलेल्या मनुष्याचा पाण्याने नाश का केला.
- 6:13-22 मध्ये, तारू म्हटलेले मोठे जहाज बांधाण्याच्या देवाच्या आज्ञेला नोहाने कसा प्रतिसाद दिला.
- 7:8-9 मध्ये, नोहाच्या कुटुंबियासह देवाने आणखी कोणाकोणाला तारवात आणले.
- 8:14-22 मध्ये, जलप्रलयानंतर, देवाला संतोष होईल असे नोहाने काय केले.

नोहा आणि जलप्रलयाचा **कथावृत्तांत सांगा.** यासाठी तुम्हांला मोठया मुलाकडून तयारी करुन घेता येईल.

नोहा प्राण्यांना तारवात नेतो ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा. मुलांना ही नाटिका मोठया माणसांसमोर सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्रायांशी बोलून व्यवस्था करा. मोठया मुलांनी लहानांना मदत करावी.

- नोहाने कोणकोणते प्राणी तारवात घेतले त्यांची नावे मुलांना विचारा (गाई, मेंढरे, वाघ, कुत्रे, मांजरे, गाढवे, कांगारु, ससे इत्यादी)
- मुले कोणत्या प्राण्यांची भूमिका करणार ते ठरवा.
- प्राण्यांची चालण्याची पद्धत, आवाज करण्याची लकब यावरुन इतर मुलांनी ते प्राणी कोण आहेत ते ओळखावे: **गाढव**-किंचाळते. **सिंह** गर्जना करतो. **वाघ** डरकाळी फोडतो. **मेंढया** बें बें करतात. **बैल** हंबरतात (डोक्यावर बोटे उभी धरुन शिंगे असल्याचे भासवावे) इत्यादि
- प्राण्यांना तारवात नेणाया नोहाची भूमिका मोठया मुलाने करावी. प्राणी जोडी जोडीने येतात. नोहा त्यांना सांगतो, ''लवकर, लवकर चला! मोठा पूर येणार आहे पट्कन तारवात जाऊन बसा!''
- प्राण्याची प्रत्येक जोडी तारवात जाताना त्यांनी ओणवे होऊन जावे. तसेच ससे किंवा कांगारु ह्यांनी उडया मारत जावे. मुलांनी ते ज्या प्राण्याची भूमिका करीत आहेत त्यांचे आवाज काढावेत. हत्तीची भूमिका करणाया मुलांनी सोंड म्हणून हात हवेत हालवत थोडे वाकून चालावे.

मुलांनी ते ज्या प्राण्याची भूमिका करणार आहेत त्याचे चित्र काढावे. मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी (पुढे काही चित्रे नमुना म्हणून दिली आहेत)

वरती भाग 1 मध्ये कथावृत्तांताविषयीचे प्रश्न दिले आहेत ते मुलांना विचारा.

- नोहा व प्राणी ह्यांचा कथावृत्तांत तुम्ही प्रौढांसमोर सादर करणार असाल तर त्यांना कोणकोणते प्राणी आहेत ते ओळखण्यास सांगा. **तसेच मुलांनी** त्यांना प्रश्न विचारावेत.

मुलांना पाण्यावरील तारवाचे चित्र काढायला सांगा.

- देव येशू ख्रिस्ताच्या द्वारे आम्हा विश्वासणाऱ्यांना पापापासून कसे वाचवतो हे ह्या तारवाच्या चित्रातून कसे पहायला मिळते ते मुलांना विचारा. येशू कशा प्रकारे तारवासारखा आहे?

नोहा आणि तारु याविषयी लहानशी कविता वा गाणे लिहा. मुलांनी काय लिहिले ते त्यांनी घरी आईवडीलांना आणि उपासनेत मोठया माणसांना गाऊन किंवा वाचून दाखवावे.

पुढे दिलेली चित्रे मुलांना नमुना म्हणून दाखवा. मुलांनी पुढील किंवा त्यांच्या आवडीची चित्रे काढावीत.

**कविता :** चार मुलांना स्तोत्र 32 मधून, 1,3,5 व 7 ही वचने प्रत्येकी एक याप्रमाणे म्हणायला सांगा.

''ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे, ज्याच्या पापावर पांघरुण घातले आहे, तो धन्य!

''मी गप्प राहिलो होतो, तेव्हा सतत कण्हण्यामुळे माझी हाडे जीर्ण झाली.



''मी आपले पाप तुझ्याजवळ कबूल केले, मी आपली अनीति लपवून ठेविली नाही, मी आपले अपराध परमेश्वराजवळ कबूल करीन असे मी म्हणालो, तेव्हा तू मला माझ्या पापदोषाची क्षमा केली.

''तू माझे आश्रयस्थान आहेस, तू संकटापासून माझे रक्षण करिशील, मुक्ततेच्या स्तोत्रांनी तू मला वेढिशील''

**पाठ करा** प्रे. कृ. 2:38

**मोठया मुलांना** लहानशी गोष्ट लिहिण्यास सांगा.

- एका मुलाचे मित्र वाईट असतात ते त्याला एका दुकानात चोरी करण्यासाठी स्वत: बरोबर, येण्यास सांगतात तो नकार देतो. मित्रांना राग येऊन ते त्याला वाईट-साईट बोलतात.

- मित्र दुकानात चोरी करताना पोलीसांकडून पकडले जातात आणि त्यांना तुरुंगात टाकले जाते.
- तो मुलगा आपल्या मित्रांसाठी जेवण घेऊन जातो.

मुलांनी त्यांची कल्पनाशक्ती लढवून गोष्ट पूर्ण करावी. पापाला कशा प्रकारे शिक्षा झाली पाहिजे पण देवाच्या शिक्षेपासून येशू आम्हांला वाचवतो हे उदाहरण यातून समजले पाहिजे.

**प्रार्थना .**''हे प्रिय बापा, आम्ही तुझी स्तुती करतो कारण देवाच्या न्यायी शिक्षेपासून वाचण्यासाठी तू आम्हांला सुरक्षित आसरा **दिलास नोहा,** त्याची पत्नी व मुले यांचेही तू असेच रक्षण केलेस. येशूच्या नावात मागितले आहे आमेन.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net